# रे.दि.मु.नं. ९/२०१३ मधील नि.१ खालील प्राथमिक मुद्दावरील आदेश (विश्वात्मक गुरुदेव जंगली महाराज आश्रम वि. अशोक कुलकर्णी वगैरे ६)

१. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द, प्रतिवादी क्र.१ ते ४ तारीख १२.०१.२०१० रोजी त्या दावा मिळकतीसंदर्भात करुन घेतलेला चुक दुरुस्तीचा लेख वादी संस्थेवर बंधनकारक नाही व दावा मिळकत ही वादी संस्थेच्या मालकीची आहे असे हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी आणि प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीमधील वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नि.३५ अन्वये दाव्यास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. तसेच सदरील मिळकत ही सार्वजनिक न्यासाची आहे, त्या अनुषंगाने त्याबाबत दावा चालविणेस वादी संस्थेने धर्मादाय आयुक्त सांगली यांची परवानगी घेतलेली नाही. तसेच मुंबई सावर्जनिक न्यास अधिनियमाचे तरतुदीनुसार हा दावा चालविणेचा अधिकार या न्यायालयास नाही असा आक्षेप घेतला आहे. प्रतिवादीनी नि.३३ कडे त्या अनुषंगाने अर्ज देवून प्राथमिक मुद्दा काढणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे दावा व कैफियतीमधील कथने विचारात घेतली. तसेच वादीने नि.३३ कडे केलेला अर्ज विचारात घेतला. त्या अनुषंगाने प्रस्तुतचा दावा चालविण्याची अधिकारता या न्यायालयास आहे किंवा नाही हे ठरविणेसाठी प्राथमिक मुद्दा काढला. वादी व प्रतिवादींचे युक्तिवाद ऐकले. मी काढलेला प्रारंभिक मुद्दा व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमीमांसेसहीत पुढीलप्रमाणे–

| | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा दावा चालविणेची अधिकारिता या न्यायालयास आहे काय? | होय. |

२. आदेश काय? अंतीम आदेशाप्रमाणे.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः**

४. वादीतर्फे श्री ए.आर.जाधव यांनी युक्तिवाद करताना असे प्रतिपादन केले की, प्रस्तुतचा दावा हा मिळकतीचे हक्कज्ञापन आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी केलेल्या चुक दुरुस्ती दस्ताचे हक्कज्ञापन होवून मिळणेसाठीचा आहे. त्यामुळे तसे हक्कज्ञापन ठरविण्याचा अधिकार हा दिवाणी न्यायालयाला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालविण्याची अधिकारीता या न्यायालयास आहे. त्या अनुषंगाने त्यांनी **साईनाथ मंदिर ट्रस्ट वि. विजय मंडले व इतर २००३ डीजीएलएस (एएचसी) ४३२** या प्रकरणामधील आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयविधीचा आधार घेतला.

५. प्रतिवादीतर्फे युक्तिवाद करताना वादीने केलेले ठराव व इतिवृत्त हे बनावट आहे, चुक दुरुस्ती दस्तातील मजकुराबाबत वादीनी या ठिकाणी हरकती उपस्थित केलेल्या आहेत. परंतु त्याबाबतचे अधिकार हे सार्वजनिक न्यास अधिनियमाच्या अंतर्गत धर्मादाय आयुक्तांना दिलेले आहेत. त्यामुळे हा दावा चालविणेचा अधिकार या न्यायालयास नाही असा मुद्दा उपस्थित केला.

६. वादीचा दावा पाहिला. त्यामध्ये वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४ हे वादी न्यासाचे अध्यक्ष व पदाधिकारी होते ही वस्तुस्थिती प्रतिवादीनी मान्य केली आहे. वादीने पुढे दाव्यामध्ये असे नमुद केले आहे की, दाव्यातील नमुद मिळकती या प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचेकडून वादी न्यासासाठी प्रतिवादी क्र. १ यांनी विकत घेतली व पुढे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी न्यासाच्या विरुध्द वर्तन केल्याबाबत त्यांचेविरुध्द कार्यवाही करणेचा प्रयत्न सुरु केला असता त्यांनी तारीख २१.०४.२००९ च्या नोंद खरेदीपत्राबाबत तारीख १२.०१.२०१० रोजीचा चुक

दुरुस्ती लेख करुन घेतला व ती मिळकत सद्‌गरु जंगली महाराज आश्रम वळीवडे, कोल्हापूर ता.करवीर जि.कोल्हापूर संचलीत विश्वात्मक गुरुदेव जंगली महाराज शिक्षण संस्था विद्यानगर मिरज असा मजकुर लिहून घेणार म्हणून केला. सदरील चुक दुरुस्ती लेख तारीख १२.०१.२०१० रोजी अस्तित्वात आला ही वस्तुथिती वादी व प्रतिवादींना मान्य आहे.

७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे नियम ९ पाहिला. त्यामध्ये न्यायालयाने ज्या दाव्याची दखल घेण्यास स्पष्टपणे वा उपलक्षीत पणे बाध असेल त्या दाव्याव्यतिरिक्त दिवाणी स्वरुपाच्या सर्व दाव्याची संपरिक्षा करण्याची अधिकारीता असेल. त्यामध्ये दिलेले स्पष्टीकरण १ पाहिले. त्यामध्ये ज्या दाव्यामध्ये मालमत्तेवरील अथवा एखाद्या पदावरील अधिकार वादास्पद असेल, मग तो अधिकार हा धार्मिक विधी अथवा संबंधीताच्या प्रश्नाच्या निर्णयावर सर्वस्वी अवलंबून असला तरीही तो दिवाणी स्वरुपाचा दावा होईल. हे पाहिले असता केवळ प्रस्तुतचा वाद हा धर्मादाय संस्थेच्या अनुषंगाने आहे अथवा धर्मादाय संस्थेच्या संदर्भातील आहे या कारणास्तव तो दावा चालविण्याचा अधिकार हा दिवाणी न्यायालयास नाही असे अनुमान काढता येणार नाही.

८. प्रतिवादीतर्फे युक्तिवाद करताना सार्वजनिक न्यास अधिनियमाचे कलम ५० चा आधार घेतला. मात्र त्यामध्ये दिवाणी न्यायालयास प्रस्तुतचा वाद चालविणेपासून प्रतिबंध केलेला नाही. न्यायालयाची अधिकारीता ही वादीने दाव्यामध्ये नमुद केलेल्या मागणीवरुन ठरत असते. त्यावेळी प्रतिवादीचा बचाव काय आहे हे पाहणेची जरुरी नसते. वादीने दावा मिळकतीसंबंधातील मालकीबाबतचे हक्कज्ञापन मागितलेले आहे. कोणत्याही मिळकतीचे मालकी संदर्भातील हक्कज्ञापन ठरविण्याचा अधिकार हा दिवाणी न्यायालयास आहे. तो इतर न्यायालयास नाही. त्यामुळे मिळकतीचे हक्कज्ञापन ठरविण्याचा अधिकार या न्यायालयास नाही अथवा हा दावा चालविण्याचा अधिकार या न्यायालयास नाही असे प्रतिवादीनी घेतलेल्या कैफियतीमधील बचावाचे अनुषंगाने ठरविणे संयुक्तिक नाही. तसेच कोणत्याही

प्रकरणात निर्णय देण्याची अधिकारीता ही दिवाणी न्यायालयास आहे, त्यास त्यापासून प्रतिबंधीत केलेले नाही. **सबब मुद्दा क्र.१ बाबत माझा निष्कर्ष होकारार्थी आहे.**

**मुद्दा क्र .२ बाबतः**

९. उपरोक्त विवेचनानुसार मुद्दा क्र. १ बाबत माझा निष्कर्ष होकारार्थी आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालविणेचा अधिकार या न्यायालयास आहे. सबब मुद्दा क्र.२ चे उत्तारादाखल मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा दावा चालविणेची अधिकारीता या न्यायालयास आहे.

२. वादी–प्रतिवादींना असे निर्देश देणेत येत आहे की, त्यांनी प्रस्तुत दाव्याचे काम पुढे चालविणेचे दृष्टीने योग्य ती पुर्तता करावी.

सही/–३.२.१७

मिरज. ( वि.रा. पाटील)

दिनांकः ०३.०२.२०१७ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर मिरज.